N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** अर्जुनी मोरगांव **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0084 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/05/2019 20:25 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 16/05/2019
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/05/2019
   **Time From (वेळेपासून):** 12:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/05/2019 **Time (वेळ):** 19:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 032 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/05/2019 19:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अर्जुनी/मोर लघु पाटबंधारे ,अर्जुनी/मोर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मुरारी काशीराम लाडे

(b) **Father's Name (वडील का नाव) :** काशीराम लाडे

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1963 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

## फिर्याद

शिबीर — अर्जुनी/मोरगाव
दिनांक १६.०५.२०१९

मी मुरारी काशीराम लाडे, वय ५६ वर्ष, व्यवसाय–शेती, रा. निलज, ता. अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया, मो.क्र. ९६२३७२०४१५

मी दि. १३.०५.२०१९ रोजी पोलीस उपअधिक्षक श्री रमाकांत दत्तात्रय कोकाटे ला.प्र.वि गोंदिया यांचे समक्ष लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

" मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, गोंदिया येथे येवुन तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर आपल्या कुटंबासह राहतो व शेतीचे काम करतो. माझ्या नावाने ग्राम निलज येथे २ एकर शेतजमीन आहे.

'मागेल त्याला सिंचन विहीर' योजने अंतर्गत सन २०१६–१७ मध्ये पंचायत समिती, अर्जुनी मोरगाव येथुन माझ्या नावे विहीर मंजुर झाली होती. या योजनेनुसार मार्च २०१८ ला विहीरीचे खोदकाम/बांधकाम पुर्ण झाले असुन विहीरीमधील बोअरवेलचे काम बाकी होते. विहीरीच्या संपुर्ण कामाकरीता एकुण रू. २,५०,०००/– मंजुर निधीपैकी मला रू. २,२५,०००/– प्राप्त झालेले आहेत.

सदर विहीरीतील उर्वरीत बोअरवेलचे काम मार्च २०१९ मध्ये मी माझ्या वैयक्तिक खर्चातुन पुर्ण केले आहे. त्याबाबत श्री. काळे, कनिष्ठ अभियंता, लघु सिंचन जि.प. उपविभाग, अर्जुनी मोरगाव यांनी पाहणी सुध्दा केली आहे. एप्रिल २०१९ मध्ये बोअरवेलच्या कामाचे उर्वरीत बिलाबाबत विचारपुस करण्याकरीता मी श्री. काळे, कनिष्ठ अभियंता., लघु सिंचन जि.प. उपविभाग, अर्जुनी मोरगाव यांच्याकडे गेलो असता त्यांनी मला म्हटले की, 'तुम्ही मला रू. २,०००/– द्या, त्यानंतरच मी तुमच्या बोअरवेलच्या बिलाचा प्रस्ताव पंचायत समिती, अर्जुनी मोरगाव येथे पाठवितो, असे म्हटले. त्यावर मी त्यांना बिलाची रक्कम माझ्या खात्यामध्ये जमा झाल्यानंतर मी आपणास रू. २,०००/– देईन, असे बोलुन निघुन आलो.

माझ्या विहीरीतील बोअरवेलच्या उर्वरीत बिलाचा प्रस्ताव पंचायम समितीकडे पाठविला किंवा कसे याबाबत विचारपुस करण्याकरीता मी दि. ०९.०५.२०१९ रोजी श्री. काळे, कनिष्ठ अभियंता यांना भेटलो असता, त्यांनी 'मी तुमच्या बोअरवेलच्या बिलाचा प्रस्ताव पंचायत समिती, अर्जुनी मोरगाव येथे पाठविला आहे, आज उदया तुमच्या बॅक खात्यात पैशे जमा होतील. त्यानंतर तुम्ही रू. २,०००/– मला आणुन दया', असे म्हटले. त्यानंतर मी आज दि. १३.०५.२०१९ रोजी बोअरवेल बिलाची रक्कम रू. २५,९८१/– माझ्या देना बॅकेच्या खात्यात जमा झाल्याची खात्री केली आहे.

गै.अ. श्री. काळे,कनिष्ठ अभियंता,लघु सिंचन जि.प.उपविभाग,अर्जुनी/मोरगाव,जि. गोंदिया यांनी माझ्या नावे 'मागेल त्याला सिंचन विहीर योजने अंतर्गत' विहीर–बोअर बिलाची उर्वरीत रक्कम रू.२५,९८१/– चा प्रस्ताव पंचायत समिती, अर्जुनी मोरगाव येथे पाठविल्याचा मोबदला म्हणून माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. २,०००/– त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक संबंध नाहीत किंवा त्यांचेशी माझे पुर्व वैमनस्य नाही. माझी तक्रार मी वाचुन पाहिली. माझे सांगणेप्रमाणे संगणकावर बरोबर टंकलिखीत केली आहे."

मुरारी काशीराम लाडे
१६-५-२०१९

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मौजा निलज ,अर्जुनी/मोर ,अर्जुनी मोरगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मौजा निलज ,अर्जुनी/मोर ,अर्जुनी मोरगांव,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9623720415

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शशिकांत पुंडलिक काळे | | वडील का नाम : पुंडलिक काळे | 1. शास्त्री वार्ड , ,सौंदड ,सडक / अर्जुनी, दुग्गिपूर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वसंत भिवा भोंडे | | वडील का नाम : भिवा भोंडे | 1. साईनगर ,सानगडी ,साकोली ,साकोली, भंडारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपयाचे 04चलनी नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, यातील आरोपी लोकसेवक क्रमांक1 यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन मागेल त्याला सिंचन विहीर योजने अंतर्गत तक्रारदाराच्या नावे मंजुर असलेल्या विहीरीतील बोअरवेलच्या बिलाच्या रक्कमेचा प्रस्ताव तयार करुन पंचायत समिती, अर्जुनी/मोरगांव येथे पाठविल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदाराकडे रुपये 2000/ - लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी लोकसेवक क्रमांक2 यांच्या मार्फतीने स्विकारल्याने तक्रारदाराच्या लेखी रिपोर्ट वरून नमुद कलमान्वये सदर चा गुन्हा नोंद करून तपासात घेतला. समक्ष- मा. पोलीस उपअधिक्षक रमाकांत कोकाटे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Anil Kawduji Kumre(SI (Sub-Inspector)) / 4246 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन त्यांची ओळख आमच्याशी करुन दिली. श्री कोकाटे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार पंचांना वाचावयास दिली. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. २,०००/— त्यांच्याकडे जमा केली. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणाऱ्या ॲंथ्रासीन पावडरची वैशिष्ट सांगुन नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले .

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत आम्हास व पंचास सविस्तर माहीती दिली. त्यांनी पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हॉईस रेकार्डरद्वारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा करण्यात येईल असे सागीतले. लाच मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर द्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पुढील सापळा पडताळणी कार्यवाही दि. १४.०५.२०१९ रोजी करण्याचे ठरविण्यात आले. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी मला घरी जाण्याचे सांगुन मला दि. १४.०५.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ हजर राहण्याच्या तसेच या कार्यवाही बाबत गुप्तता बाळगण्याच्या सुचना दिल्या. या कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सांगण्यानुसार मी दि. १४.०५.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा दरम्यान अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ पोहचलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे हे दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्यांसह त्याठिकाणी हजर आले. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ ११.२५ वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये पंच क्र. १ व माझा आवाजात पडताळणी करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनीमुद्रीत करुन पिशवीच्या सहायाने व्हाईस रेकॉर्डर माझ्या गळ्यात लटकावला व मला पंच क्रमांक १ काळबांधे यांचेसह शासकीय मोटार सायकलने कार्यालय लघु सिंचन (जि.प.) उपविभाग, अर्जुनी मोरगाव येथे जाण्यास रवाना केले. लघु सिंचन (जि.प.) उपविभाग, अर्जुनी मोरगाव येथे गै.अ. श्री काळे, कनिष्ठ अभियंता यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी “मागेल त्याला सिंचन विहीर” योजने अंतर्गत माझ्या नावे मंजुर असलेल्या विहीरीतील बोअरवेलच्या बिलाच्या रक्कमेचा प्रस्ताव तयार करुन पंचायत समिती, अर्जुनी मोरगाव येथे पाठविल्याचा मोबदला म्हणून माझ्याकडे रु. २,०००/— लाचेची मागणी केली. सदर लाच रक्कम लघु सिंचन (जि.प.) उपविभाग, अर्जुनी मोरगाव येथील श्री रामटेके, बडे बाबु किंवा भोंडे बाबु यांचेकडे देण्याचे सांगुन त्यांचे मार्फतीने ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर वेळ १३.४६ वा मी पंच क्र. १ यांच्यासह अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ परत आल्यावर व्हाईस रेकार्डर पंच क्र. १ यांच्या आवाजात बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुन गै.अ. श्री. काळे, कनिष्ठ अभियंता, लघु सिंचन जि.प. उपविभाग, अर्जुनी मोरगाव, यांनी “मागेल त्याला सिंचन विहीर” योजने अंतर्गत माझ्या नावे मंजुर असलेल्या विहीरीतील बोअरवेलच्या बिलाच्या रक्कमेचा प्रस्ताव तयार करुन पंचायत समिती, अर्जुनी मोरगाव येथे पाठविल्याचा मोबदला म्हणून माझ्याकडे रुपये २,०००/— लाचेची मागणी केली.

मुरारी काशीराम खोटे
१६-५-२०१९

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.** (आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

स्टे. डा. अमलदार
पो.स्टे.अ. / मोर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Anil Kawduji Kumre
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 4246

सदर लाच रक्कम लघु सिंचन (जि.प.) उपविभाग, अर्जुनी मोरगाव येथील श्री रामटेके, बडे बाबु किंवा भोंडे बाबु यांचेकडे देण्याचे सांगुन त्यांचे मार्फतीने ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली.

गै.अ. श्री. काळे यांनी लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान लाच रक्कम रु. २,०००/— आज किंवा उद्या श्री रामटेके, बडे बाबु किंवा भोंडे बाबु यांचेकडे देण्याचे सांगीतल्यावरुन पुढील सापळा कार्यवाही दि.१५.०५.२०१९ रोजी करण्याचे ठरविण्यात आले. पोलीस उपअधिक्षक, श्री कोकाटे यांनी मला घरी जाण्यास सांगुन दि. १५.०५.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ हजर राहण्याच्या तसेच सदर कार्यवाही बाबत गोपनियता बाळगण्याचा सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सांगण्यानुसार मी दि. १५.०५.२०१९ रोजी सकाळी ११.०० वा दरम्यान अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ पोहचलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे हे दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्यांसह त्याठिकाणी हजर आले. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी मला लोकसेवकांनी लाचेच्या मागणी केली असुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे पंचासमक्ष सांगीतले. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी माझ्याकडुन स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यावर गळयातील दुपटट्टा काढुन चेहरा पुसुन हातात ठेवण्याचा नियोजीत इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर ॲंथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रु २,०००/— माझे फुलपॅन्टचे समोरील उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. त्यानंतर पंच क्र. १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर ११.३५ वा सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर पिशवीच्या सहायाने माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्रमांक १ यांचेसह शासकीय मोटार सायकलने लघु सिंचन (जि.प.) उपविभाग, अर्जुनी मोरगाव येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो—माग आले. त्याठिकाणी गै.अ. श्री. काळे तसेच श्री रामटेके, बडे बाबु किंवा भोंडे बाबु हे हजर न मिळाल्याने दिलेल्या सुचने प्रमाणे मी अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ परत आलो. त्यानंतर वेळ १२.२० वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला.

या सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. श्री. काळे तसेच श्री रामटेके, बडे बाबु किंवा भोंडे बाबु हे कार्यालयात हजर न मिळाल्याने पुढील सापळा दि. १६.०५.२०१९ रोजी करण्याचे ठरविण्यात आले. पोलीस उपअधिक्षक, श्री कोकाटे यांनी मला घरी जाण्यास सांगुन दि. १६.०५.२०१९ रोजी सकाळी १२.०० अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ हजर राहण्याच्या तसेच या कार्यवाही बाबत गुप्तता बाळगण्याच्या सुचना दिल्या. या कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. ३ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सांगण्यानुसार मी दि. १६.०५.२०१९ रोजी सकाळी १२.०० वा दरम्यान अर्जुनी मोरगाव येथील दाभना फाटयाजवळ पोहचलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे हे दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्यांसह त्याठिकाणी हजर आले. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना

मुरारी काशीराम लांडे
१६-५-२०१९

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

देवुन लोकसेवक यांनी माझ्याकडुन स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यावर गळयातील दुपटट्ा काढुन चेहरा पुसुन हातात ठेवण्याचा नियोजीत इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले. त्यानंतर पंच क्र. १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर वेळ १२.५० वा. व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर पिशवीच्या सहायाने माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्र. १ यांचेसह शासकीय मोटार सायकलने लघु सिंचन (जि.प.) उपविभाग, अर्जुनी मोरगाव येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो—माग आले.

त्यानंतर मी व पंच क्र. १ लघु सिंचन (जि.प.) उपविभाग, अर्जुनी मोरगावचे आत गेलो. त्याठिकाणी गै.अ. श्री काळे तसेच श्री रामटेके, बडे बाबु हे कार्यालयात हजर मिळाले नाही. परंतु कार्यालयात श्री भोंडे बाबु हे कक्षात हजर होते. त्यांना भेटुन गै.अ. श्री काळे यांनी माझे बोरवेलचे बिल पंचायत समिती येथे पाठविल्याचा मोबदला म्हणुन मागणी केलेली रक्कम रु. २,०००/— आपल्याकडे देण्यास सांगीतले आहे, असे सांगीतले. त्यावर त्यांनी रु. २,०००/— स्विकारण्यास सहमती दर्शविली. त्यावरुन ॲन्थ्रासीन पावडर लावलेल्या लाच रक्कम रु. २,०००/— ( रु.५००/— दराच्या ४ नोटा) मी माझे फुलपॅन्टचे उजव्या खिश्यातुन काढुन श्री भोंडे बाबु यांना पंचासमक्ष दिले. त्यांनी ती लाच रक्कम रू. २,०००/— आपले उजवे हाताने स्विकारून आपले समोरील टेबलवर ठेवले. त्यानंतर मी पंच क्र. १ सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री. वसंत भिवा भोंडे, कनिष्ठ सहाय्यक, कार्यालय उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे (जि.प.), उपविभाग, अर्जुनी मोरगाव यांना रंगेहात पकडले. त्यानंतर वेळ १३.३३ वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करुन पुढील कार्यवाही करण्यात आली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र.४ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक श्री. शशिकांत पुंडलिक काळे, वय ४९ वर्ष, कनिष्ठ अभियंता, कार्यालय उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे (जि.प.), उपविभाग, अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून "मागेल त्याला सिंचन विहीर" योजने अंतर्गत माझ्या नावे मंजुर असलेल्या विहीरीतील बोअरवेलच्या बिलाच्या रक्कमेचा प्रस्ताव तयार करुन पंचायत समिती, अर्जुनी मोरगाव येथे पाठविल्याचा मोबदला म्हणून माझ्याकडे रु. २,०००/— लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम श्री. वसंत भिवा भोंडे, कनिष्ठ सहाय्यक, कार्यालय उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे (जि.प.), उपविभाग, अर्जुनी मोरगाव यांच्या मार्फतीने स्विकारली. म्हणुन माझी त्याचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

मुरारी काशीराम लाडे
१८-५-२०१९

समक्ष
(signature) 18/5/19

(रमाकांत कोकाटे)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया